दुरध्वनी क्र. ०२०२५५०९१५०

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
येरवडा, पुणे महानगरपालिका
जावक क्र- मसआ/ये/ ४७८४
दिनांक :- १८/११/१६

अपिल अधिकारी तथा महापालिका सहायक आयुक्त (येरवडा) पुणे महानगरपालिका यांचे प्राधिकरणात
अपिल क्र.– आवक क्र.३/१/२०२ दि.१८/११/२०१६

१) श्री.ओव्हाळ दिनेश नेमाजी
स.नं.२७, पंचशिलनगर,
येरवडा, पुणे –४११००६

...अपिलार्थी

विरूद्ध...

२) जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता
येरवडा क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलकर्ता श्री.ओव्हाळ दिनेश नेमाजी स.नं.२७, पंचशिलनगर, येरवडा, पुणे –४११००६ यांनी शासकीय माहिती अधिकार अंतर्गत अपिल अधिकारी यांचेकडे आवक क्र.३/१/२०२ दि.२९/१०/२०१६ अन्वये अपिल दाखल केले असून या अपिलाची सुनावणी दि.१८/११/२०१६ रोजी ठेवण्यात आली होती.

अपिल अर्जात येरवडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत एकूण प्रभागामधील गवनि परिसरातील नागरिकांना स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र योजनेअंतर्गत वैयक्तिक शौचालये बांधून दिली आहेत किंवा नाही याचा तपशिलवार माहिती मिळणे विषयी अर्ज दाखल केला होता. महापालिका सहायक आयुक्त कार्यालयाकडील जावक क्र.मसआ/ये/३२४१, दि.२७/९/२०१६ ने अर्जदारास माहिती पत्राद्वारे पाठविण्यात आली आहे. सदरची माहिती चुकीची व दिशाभुल करणारी असल्याने अर्जदाराने अपिल दाखल केले आहे.

मी अपिल अधिकारी तथा महापालिका सहायक आयुक्त , येरवडा कार्यालय, पुणे महानगरपालिका केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अपिलार्थी श्री. बाबुराव टाक त्यांनी दाखल केलेल्या अपिलात खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

**"श्री.ओव्हाळ दिनेश नेमाजी यांना माहितीच्या अर्जातील मुद्दा क्र.४, ५ व ६ ची उपलब्ध असलेली माहिती व आवश्यक माहितीचे दस्तऐवज आठ दिवसांत द्यावी. "**

विजय लांडगे
महापालिका सहाय्यक आयुक्त (येरवडा)
तथा अपिल अधिकारी
पुणे महानगरपालिका

- टिप– या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास /माहिती न मिळाल्यास मा. राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नविन इमारत,चौथा मजला, विधानभवन समोर, पुणे ४११००१ येथे द्वितीय अपिल करू शकता.

प्रत – सर्व कनिष्ठ अभियंता, येरवडा क्षेत्रिय कार्यालय, पुणे मनपा